Vol 6 Issue 11 August 2017 ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास



*प्रा.डॉ.कु.शोभा महारु चौधरी*
*सहाय्यक प्राध्यापक , धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.*

*सारांश :*

प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेण्यात आलेला आहे. त्यासाठी 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी डॉ. आभाराणी बिस्त यांच्या प्रमाणित स्वसंकल्पना ताण चाचणीचा तसेच डॉ. अस्थना यांच्या प्रमाणीत समायोजन चाचणीचा वापर करण्यात आला. पिअरसनच्या परिघात परिगुणन पद्धतीने स्वसंकल्पना ताण व समायोजन या दोन चलांमधील सहसंबंध काढण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, मुली, कला व विज्ञान शाखेचे विद्यार्थी, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आला.

## *प्रस्तावना :*

स्व–संकल्पनेच्या संदर्भात वेगवेगळी मते मांडली जातात. तरीही असे म्हणता येईल की, ''स्वतःबद्दलचे रचनाबद्ध संवेदन जे आपल्या बोधावस्थेला अवगत होत असते किंवा मान्य होत असते किंवा होते त्यास स्व–संकल्पना असे म्हणता येईल.'' यात पुढील घटकांचा समावेश होतो. जसे– स्वतःच्या गुण–वैशिष्ट्यांचे आणि क्षमतांचे संवेदन इतर व्यक्तीच्या आणि परिवेशाच्या संदर्भात स्वतःची स्व–संकल्पना, अनुभव आणि संबंधित व्यक्ती घटकांशी गुणात्मक मूल्य, ध्येय आणि कल्पना, ज्यांना धनात्मक किंवा ऋणात्मक मूल्यांच्या स्वरुपात संवेदिले जाते.

ऑलपोर्टच्या मते, स्व–संकल्पना ही स्व–ओळख, स्व–आदर्श, स्व–प्रतिमा, संवेदित स्व, बोधात्म–स्व अशा अनेक संज्ञांपैकी एक स्व–संवेदनाची संज्ञा आहे. एलिजाबेथ हरलॉक (1981) च्या मते, ''स्व–संकल्पना ही व्यक्तीने स्वतःबद्दल स्वतःच निर्माण केलेली प्रतिमा आहे.'' ह्या व्यक्तीच्या विविध विश्वासावर किंवा श्रद्धेवर आधारित असतात. ह्यामध्ये व्यक्तीच्या शरीर अवयवासंबंधी विश्वास, मानसिक क्षमतासंबंधी विश्वास तसेच सामाजिक आणि भावनिक वर्तन वैशिष्ट्यांसंबंधी असलेले मत वा विश्वास इ. चा समावेश होतो. प्रेरणा, ध्येय तसेच त्यांची उपलब्धी यासंबंधी व्यक्तीचा विश्वास ह्यामुळे व्यक्तीच्या विविध स्व–संकल्पनांची निर्मिती होते.

आपली स्वसंकल्पना आपणास आपण कोण आहोत? याची ओळख करुन देते. आपल्या भोवतालच्या व्यक्ती आणि परिस्थिती जरी बदलत असल्या तरी आपली स्व'–संकल्पना आपणास जाणीव करुन देत असते की, तुम्ही काल जसे होता तसेच आहात. आपली स्व–प्रतिमा ही आपल्या शरीरापेक्षा ही जास्त खरी असते आणि तिच्या नियंत्रणाच्या मार्गामुळेच आपणास आपल्या शरीराचे अनुभव येत असतात. आपणास स्व–ओळखीची जाणीव होणे इतके महत्त्वाचे असते की, एखाद्याची किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटत असेल तर त्या गोष्टींचा त्यामुळे प्रतिकार करता येतो. काही वेळा स्व–संकल्पनेला धक्का पोहोचतो व त्यामुळे स्व–संकल्पना ताण निर्माण होतो. या स्वसंकल्पना ताणाचा समायोजनावर होणा–या परिणामाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

## *संशोधनाची गरज :*

कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी ची मुले ही साधारणतः कुमारवयीन असतात. कुमारावस्था ही अत्यंत नाजुक अवस्था असते. शारीरिक वाढ झपाट्याने होते, परंतु सामन्यपणे 'अस्थिरता' हेच या अवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. या अवस्थेत विद्यार्थ्यांची स्व–संकल्पना सतत दोलायमान होत राहते. आईवडीलांकडून मिळालेला उपदेश नकोसा वाटतो. स्वतःची मते मांडण्याची इच्छा असते. त्याला विरोध झाला तर भावनिक संघर्ष निर्माण होतो. स्व संकल्पनेत शारीरिक आणि मानसिक स्व–प्रतिमांचा समावेश होतो. शारीरिक स्व–प्रतिमा प्रथम तयार होतात. व्यक्तीचे दिसणे, शरीरयष्टी, आकर्षकता इ. चा समावेश होतो. मानसिक स्वप्रतिमा, व्यक्तीचे विकार, भावना, समायोजन क्षमता यावर आधारित असते. तसेच आत्मविश्वास, धैर्य, प्रामाणिकपणा, महत्वाकांक्षा इ. गुणांचाही त्यावर परिणाम होतो. मुलाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा व्यक्ती म्हणजेच पालक, शिक्षक, समवयस्क मित्र त्याच्याबद्दल जी मते, विश्वास व्यक्त केले जातात त्यावर मुलाची स्वसंकल्पना असते. याउलट इतरांची मुलांबद्दल नकारार्थी भावना, मते असतील तर मुलाची स्वतःबद्दल तशीच स्वसंकल्पना तयार होते. मुलाचे वागणे, बोलणे, स्वभाव याबद्दलही पालक कौतुक करतात की टीका यावर स्व–संकल्पना ठरत जातात. मुलाच्या क्षमतांबद्दल सतत शंका घेणा–या पालकांची मुले स्वतःबद्दल आत्मविश्वास कमी दाखवतात. अतिरेकी अपेक्षांचाही विपरित परिणाम होतो. वास्तव अपेक्षा पालकांनी ठेवल्या तर मुलांची स्वप्रतिमा उंचावते. शारीरिक व्यंग, दुबळेपणा यामुळे जर खेळात, मित्रांच्या कृतीत सहभागी होत येत नसेल तर मित्र चिडवतात, टाळतात. या हेटाळणीचा परिणाम स्वप्रतिमेवर होतो. त्याचप्रमाणे मुलात काही विशेष कौशल्ये, क्षमता असतील तर मुले त्याला गटात स्थान देतात, पुढाकाराची संधी देतात, कौतुक करतात, यातून स्वप्रतिमा उंचावते. याउलट शिक्षक इतरांसमोर हेटाळणी करत असतील

तर स्वप्रतिमा हिणकस बनते व विद्यार्थ्यांमध्ये स्व–संकल्पना ताण निर्माण होतो. या स्वसंकल्पना ताणाचा परिणाम मुलांच्या समायोजन क्षमतेवर होतो.

प्रस्तुत संशोधनातून शिक्षक व पालक यांना मुलांमध्ये स्व–संकल्पना ताण किती प्रमाणात आहे याची माहिती मिळेल व तो कमी करण्यासाठी ते योग्य मार्गदर्शन करतील. तसेच विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता कमी असेल तर ती वाढविण्यासाठी देखील प्रयत्न करतील. म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सहसंबंध आहे का ? तो कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच या सहसंबंधाच्या बाबतीत लिंग, शाखा व क्षेत्र या घटकांनुसार वेगळेपण जाणवते का ? या प्रश्नांच्या समाधानकारक उत्तरासाठी या संशोधन अभ्यासाची गरज आहे.

### उद्दिष्टे :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

### परिकल्पना :

1) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
2) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
3) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या मुलींचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
4) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या कला शाखेच्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
5) कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
6) ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
7) शहरी भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्याचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.

### न्यादर्श :

या अभ्यासासाठी धुळे तालुक्यातील तीन ग्रामीण व तीन शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील इ. 11 वी च्या 179 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून निवड केली.

### संशोधन साधने :

या संशोधन अभ्यासासाठी स्वकसंकल्पना ताण चाचणी व समयोजन चाचणी या दोन प्रमाणित चाचण्या वापरण्यात आल्या. डॉ. आभाराणी बिस्त यांनी स्वसंकल्पना ताण चाचणी प्रमाणीत केलेली आहे. या चाचणीत एकूण 56 विधाने आहेत. प्रत्येक विधानासमोर नेहमी, ब–याच वेळा, कधी कधी, क्वचित, कधी ही नाही असे पाच पर्याय दिलेले आहेत. या चाचणीतील 49 विधाने होकारार्थी असून 07 विधाने नकारार्थी आहेत. त्यांचे गुणदान पुढीलप्रमाणे करण्यात आले.

| विधाने | नेहमी | ब–याच वेळा | कधी कधी | क्वचित | कधीही नाही |
|---|---|---|---|---|---|
| होकारार्थी | 0 | 1 | 2 | 3 | 4 |
| नकारार्थी | 4 | 3 | 2 | 1 | 0 |

या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.83 असून चाचणीत अंतर्गत रचनात्मक सप्रमाणता आहे. ही चाचणी मूळ हिंदीत असून तिचे मराठीत भाषांतर करण्यात आलेले आहे.

डॉ. अस्थना यांनी समायोजन चाचणी प्रमाणीत केलेली आहे. या चाचणीत एकूण 42 विधाने असून त्यातील 21 व 34 क्रमाकांची विधाने वगळण्यात आली आहेत. प्रत्येक विधानासमोर होय व नाही असे दोन पर्याय आहेत. या चाचणीतील विधान क्र. 19 व 40 यांचे गुणदान करतांना 'होय' प्रतिसाद असल्यास एक गुण व 'नाही' प्रतिसाद असल्यास शून्य गुण देण्यात आलेले आहेत. तसेच इतर सर्व विधानांना होय' प्रतिसाद असल्यास शून्य गुण व 'नाही' प्रतिसाद असल्यास एक गुण देण्यात आलेले आहेत. या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.97 असून चाचणीत अंतर्गत रचनात्मक सप्रमाणता आहे. ही चाचणी मूळ हिंदीत असून तिचे मराठीत भाषांतर करण्यात आलेले आहे.

### कार्यपद्धती :

या संशोधन अभ्यासासाठी संशोधिकेने सर्वेक्षण पद्धती वापरलेली आहे. न्यादर्शाला आवश्यक त्या सूचना देऊन स्वसंकल्पना ताण व समायोजन चाचणीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली. मॅन्युअलनुसार चाचणीचे गुणदान करण्यात आले. न्यादर्शाचे संपूर्ण गट, मुले व मुली, कला शाखा व विज्ञान शाखा तसेच ग्रामीण व शहरी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी असे सात गट तयार करण्यात आले.

***संख्याशास्त्रीय तंत्र :*** या संशोधन अभ्यासात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसरनच्या परिघात परिगुणन पद्धतीने स्वसंकल्पना ताण व समायोजन या चलांमधील परस्पर सहसंबध (r) काढण्यात आला.

संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन : खालील कोष्टकाच्या आधारे केलेले आहे.

कोष्टक क.1

कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

| गट क्र. | गटाचे नाव | एकूण विद्यार्थी | प्राप्त 'r' | स्वाधीनता मात्रा | सार्थकता स्तर | नमुना 'r' | प्राप्त 'r' व नमुना 'r' ची तुलना | 'r' ची सार्थकता | सांख्यिकी शुन्य परिकल्पना निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संपूर्ण गट | 179 | –0.50 | 177 | 0.05 | 0.14 | –0.50< 0.14 | सार्थक नाही | स्वीकार |
| 2 | मुले | 92 | –0.62 | 90 | 0.05 | 0.21 | –0.62< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 3 | मुली | 87 | –0.43 | 85 | 0.05 | 0.21 | –0.43< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 4 | कला शाखा | 93 | –0.43 | 91 | 0.05 | 0.21 | –0.43< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 5 | विज्ञान शाखा | 86 | –0.58 | 84 | 0.05 | 0.21 | –0.58< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 6 | ग्रामीण | 87 | –0.45 | 85 | 0.05 | 0.21 | –0.45< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |
| 7 | शहरी | 92 | –0.52 | 90 | 0.05 | 0.21 | –0.52< 0.21 | सार्थक नाही | स्वीकार |

## निष्कर्ष :

कोष्टक क्र.1 वरुन असे निदर्शनास येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता 11 वी च्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, मुली, कला शाखा व विज्ञान शाखेचे विद्यार्थी तसेच ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी यांचा स्वसंकल्पना ताण व समायोजन यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही. म्हणून सर्व परिकल्पनांचा स्वीकार करण्यात आला.

## संदर्भग्रंथ सूची :

1.Best John & Khan JAMES V. (2006), Research in Education. New Delhi; Prentice Hall of India Private Limited.
2.Mangal S.K. (November 2006), Statistics in Psychology & Education, New Delhi ; Prentice Hall of India Private Limited.
3.जगताप ह.ना., व्दितीय आवृत्ती, (मार्च 1991), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे : नूतन प्रकाशन.
4.नानकर प्रभाकर व सोहनी चित्रा., प्रथमावृत्ती, (एप्रिल 1997), शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : नूतन प्रकाशन.
5.बर्वे बी.एन., प्रथमावृत्ती, (जून 2010), जीवनमानाचे मानसशास्त्र, नागपूर : श्री विद्या प्रकाशन.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/